जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAY 2025
तरुण भारत


# वंचितांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक प्रयत्न आवश्यक

- खासदार शाहू छत्रपती यांचे प्रतिपादन
- ब्रेलमधील शाहू चरित्र पुस्तिकेचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दृष्टिहीन तसेच वंचित घटकांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक पद्धतीने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यासाठी समाजाने पुढे येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन खासदार शाहू छत्रपती यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित विक्रम रेपे संकल्पित 'राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिके''च्या प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ब्रेल लिपीमध्ये प्रकाशित होणारे हे पहिलेच शाहूचरित्र आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ब्रेलमधील शाहू चरित्र पुस्तिकेचे प्रकाशन करताना खासदार शाहू छत्रपती, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, विक्रम रेपे, प्र-कुलगुरू डॉ. पाटील, कुलसचिव डॉ. शिंदे, गणेशकुमार खोडके.

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, विक्रम रेपे आणि त्यांच्या मित्र परिवाराने सामाजिक जाणीवेच्या भावनेतून अंध व्यक्तींपर्यंत शाहू महाराजांचे जीवनकार्य ब्रेल पुस्तिकातून पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. अंध विद्यार्थ्यांना विविध विषयांतील ज्ञान देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. त्यांच्यासाठी ऑडिओबुक्सही करता येऊ शकतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शाहू संशोधन केंद्रामार्फत दृष्टिहीन व्यक्तींपर्यंत राजर्षी शाहूंचे कार्य पोहोचविण्याच्या दृष्टीने ब्रेल पुस्तिकेचा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे. कोल्हापूर पुरालेखागाराचे अभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक यांसह सर्वच क्षेत्रांतील कार्य महान आहे. हत्तींची पैदास करण्यासाठी खास निर्माण केलेले शिवारण्य, चहा-कॉफीच्या मळ्यांचा प्रयोग, अद्याप कोणाला माहित नाही. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, शाहू महाराज हे प्रत्येक नागरिकाला एक वेगळी जीवनदृष्टी प्रदान करणारे व्यक्तीमत्व आहे. सर्वंकष मानवी विकासाची नवी परिभाषा निर्माण करणारे शाहू महाराज होते.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील दृष्टिहीन व्यक्तींसाठी रिसोर्स सेंटर फॉर व्हिज्युअली चॅलेंज्ड या केंद्रामार्फत उपक्रम राबविले जातात. अंध विद्यार्थी वैज्ञानिक प्रशिक्षण, बुद्धिबळाचे प्रशिक्षण दिले आहे. लवकरच त्यांच्या स्पर्धा भरविण्याचाही मानस आहे. डॉ. विलास संगवे यांच्यापासून ते डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासारख्या ध्येयनिष्ठ संशोधकांनी विद्यापीठाच्या माध्यमातून शाहूचरित्राचे अनेक पैलू समाजासमोर आणण्याची मोलाची कामगिरी केली आहे. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विक्रम रेपे यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, वसंतराव मुळीक, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. नमिता खोत, डॉ. मंजुश्री पवार, उज्ज्वल नागेशकर, सचिन शानबाग, विक्रम जरग आदी उपस्थित होते.

## पुस्तिकेचे राज्यातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण

शाहूचरित्राच्या ब्रेल पुस्तिकेचे मुद्रक स्वागत थोरात यांच्याकडून येत्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुस्तिकेचा हिंदी व इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचाही मानस संकल्पक विक्रम रेपे यांनी यावेळी व्यक्त केला.

जनसंपर्क कक्ष
07 MAY '25
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानवर्धनासाठी नवे प्रयत्न आवश्यक

## शाहू छत्रपती : ब्रेल लिपीतील शाहूचरित्र पुस्तिकेचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात ब्रेलमधील पहिल्या शाहूचरित्र पुस्तिकेचे प्रकाशन खासदार शाहू छत्रपती व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते मंगळवारी झाले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, विक्रम रेपे, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे आणि गणेशकुमार खोडके उपस्थित होते.

**कोल्हापूर :** दृष्टिहीन तसेच वंचित घटकांच्या ज्ञानवर्धनासाठी आधुनिक पद्धतीने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यासाठी समाजाने पुढे यावे, असे आवाहन खासदार शाहू छत्रपती यांनी मंगळवारी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित विक्रम रेपे संकल्पित 'राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिके'च्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या समारंभात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

शाहू छत्रपती म्हणाले, विक्रम रेपे यांनी अंध व्यक्तींपर्यंत शाहू महाराजांचे जीवनकार्य पोहोचविण्यासाठी केलेला ब्रेल पुस्तिकेचा प्रयत्न अनुकरणीय आहे.

### पुस्तिकेचे सर्व अंधशाळांमध्ये वितरण

**ब्रेल पुस्तिकेचे मुद्रक स्वागत थोरात यांच्याकडून महाराष्ट्रातील सर्व अंधशाळांमध्ये वितरण करण्यात येणार आहे. पुस्तिकेचा हिंदी व इंग्रजीमध्ये अनुवाद करण्याचाही मानस रेपे यांनी व्यक्त केला.**

त्यांच्याप्रमाणे इतर समाजघटकांनीही वंचितांच्या सक्षमीकरणासाठी पुढे येणे अपेक्षित आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदैव सहानुभूतीचा दृष्टिकोन बाळगला आहे. विशेषतः दृष्टिहीन व्यक्तींसाठी रिसोर्स सेंटर फॉर व्हिज्युअली चॅलेंज्ड या केंद्रामार्फत त्यांच्यासाठी अनेकविध उपक्रम राबविले जातात.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. विक्रम रेपे यांनी सूत्रसंचालन केले. तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. गणेशकुमार खोडके, डॉ. नंदकुमार मोरे, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, वसंतराव मुळीक, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. नमिता खोत, डॉ. मंजुश्री पवार उपस्थित होते.

0 7 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ब्रेलमधील शाहू चरित्र दृष्टिहीनांसाठी प्रेरणादायी

## खासदार शाहू महाराज : 'राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिके'चे विद्यापीठात प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ६ : 'विक्रम रेपे आणि त्यांच्या मित्र परिवाराने सामाजिक जाणिवेच्या भावनेतून दृष्टिहीन व्यक्तींपर्यंत राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य पोहोचविण्यासाठी केलेला ब्रेल पुस्तिकेचा प्रयत्न अनुकरणीय आहे. या पुस्तकामुळे राजर्षी शाहू महाराजांचे कार्य दृष्टिहीन व्यक्तींनाही वाचता येणार आहे. हे पुस्तक त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरेल,' असा विश्वास खासदार शाहू महाराज यांनी व्यक्त केला. त्यांच्या हस्ते आज शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात 'राजर्षी शाहू महाराज ब्रेल पुस्तिके'चे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. इतिहास विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.**

खासदार शाहू महाराज म्हणाले, 'या पुस्तकाच्या निमित्ताने दृष्टिहीन व्यक्ती ब्रेलच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा अभ्यास करू शकणार आहेत. त्यांच्यासाठी हे चरित्रात्मक पुस्तक प्रेरणादायी ठरेल. त्यांच्याप्रमाणे इतर समाजघटकांनीही वंचितांच्या सक्षमीकरणासाठी पुढे येणे अपेक्षित आहे. दृष्टिहीन विद्यार्थ्यांना विविध विषयांतील ज्ञान देण्यासाठी अशा अनेकानेक उपक्रमांची आवश्यकता आहे. त्यांच्यासाठी ऑडिओबुक्सही करता येऊ शकतील. आजघडीला समाजात दृष्टिहीनांची संख्या लक्षणीय आहे. त्यांना दृष्टी प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेतच, त्याच बरोबरीने अंध अवस्थेचे मानवी जीवनातूनच निर्मूलन करण्यासाठी आधुनिक संशोधन करण्याचीही आवश्यकता आहे.'


कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सदैव सहानुभूतीचा दृष्टिकोन बाळगला आहे. विशेषतः दृष्टिहीन व्यक्तींसाठी रिसोर्स सेंटर फॉर व्हिज्युअली चॅलेंज्ड या केंद्रामार्फत त्यांच्यासाठी अनेकविध उपक्रम राबविले जातात. अंध विद्यार्थी हे प्रयोगपद्धतीमुळे विज्ञानाच्या शिक्षणापासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन वैज्ञानिक प्रयोग कसे करावेत, यासाठीचे प्रशिक्षण शिबिरही विद्यापीठ घेते. डॉ. विलास संगवे यांच्यापासून ते डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासारख्या ध्येयनिष्ठ संशोधकांनी विद्यापीठाच्या माध्यमातून शाहूचरित्राचे अनेक पैलू समाजासमोर आणण्याची मोलाची कामगिरी केली आहे.'



कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या ब्रेल लिपीमधील पहिल्या चरित्राचे प्रकाशन मंगळवारी (ता.६) खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी (डावीकडून) प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. अवनिश पाटील, विक्रम रेपे, प्रा. डॉ. प्रमोद पाटील, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. विलास शिंदे, गणेशकुमार खोडके.

इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विक्रम रेपे यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, वसंतराव मुळीक, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. नमिता खोत, डॉ. मंजुश्री पवार, डॉ. सुरेश शिखरे, डॉ. सचिन पवार, 'नॅब'चे एम. बी. डोंगरे, भाग्यश्री प्रकाशनाच्या भाग्यश्री कासोटे-पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, उज्ज्वल नागेशकर, सचिन शानबाग, विक्रम जरग यांच्यासह नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड्स, मिरजकर तिकटी अंधशाळा, अंध युवक मंच या संस्थांचे संचालक, शिक्षक उपस्थित होते.

पुण्यनगरी



# विद्यापीठात छत्रपती शाहूंना अभिवादन

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.

तरूण भारत



कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनिश पाटील आदी.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना स्मृतिदिनी अभिवादन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.

सकाळ




कोल्हापूर : येथील दसरा चौकात राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना मान्यवर.

# राजर्षी शाहू महाराजांना स्मृतिदिनानिमित्त मानवंदना

कोल्हापूर, ता. ६ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज दसरा चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते. पोलिस विभागाच्या बँड पथकाकडून मानवंदना दिली.

पुण्यनगरी

# नॅनो सायन्स, टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विभागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी. नॅनो सायन्स व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची मोठी संधी उपलब्ध असून, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या आधुनिक शिक्षण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

बुद्धीला चालना देऊन शास्त्र व तंत्रज्ञान (सायन्स अँड टेक्नॉलॉजी) यामध्ये आव्हानात्मक करिअर करायचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी 'नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुवर्णसंधी उपलब्ध आहे. या नावीन्यपूर्ण व प्रगतशील क्षेत्रांमध्ये करिअर घडवण्यासाठीचे आवश्यक शिक्षण हे विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर करता येऊ शकते. त्यामध्ये बॅचलर ऑफ सायन्स, मास्टर्स ऑफ सायन्स आणि बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी यासारखे अभ्यासक्रम निवडक विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहेत. यापुढील पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण आणि पोस्टडॉक्टरल फेलोशिप व संशोधनासाठी भारत व भारताबाहेर अमर्यादित संधी उपलब्ध आहेत.

पुण्यनगरी

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांची जयंती सोमवारी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सोमवारी सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. सी. एच. पवार, डॉ. तानाजी चौगले, डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी भवनचे रेक्टर डॉ. दीपक भादले, डॉ. मीना पोतदार, डी. बी. साबळे, डॉ. माधुरी वाळवेकर, पवन कांबळे, श्रुतिका निकाळजे, विद्यार्थी भवनचे आजी-माजी विद्यार्थी आणि प्रशासकीय सेवक, अधिकारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त दसरा चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# महावीर अध्यासनास लाखाचे अक्षय्यदान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामासाठी दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे यांनी लाखाची देणगी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दिली. कोल्हापुरातील आनंद यात्री ग्रुपचे आप्पासाहेब इनामदार यांनीदेखील अक्षय्यदान भगवान महावीर अध्यासनास दिले. या बहुत देणगीबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी अभिनंदन केले.

लोकमत

## विद्यापीठात अभिवादन


शिवाजी विद्यापीठात राजर्षींच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. देविकाराणी पाटील, डॉ. दत्ता मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट, डॉ. किशोर खिलारे, अविनाश भाले आदी उपस्थित होते.

लोकमत

## दसरा चौकात अभिवादन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त दसरा चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रभारी पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते. पोलिस बँड पथकाकडून मानवंदना देण्यात आली.

पुढारी




कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टच्या वतीने मंगळवारी अभिवादन केले. यावेळी उपस्थित मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)

# राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टच्या वतीने मंगळवारी अभिवादन केले. दसरा चौकातील त्यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिणी चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी पोलिस विभागाच्या बँड पथकाकडून मानवंदना देण्यात आली.

पुढारी

# भगवान महावीर अध्यासनाला एक लाखाचे अक्षयदान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारत बांधकामासाठी दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे यांनी १ लाखाची देणगी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर दिली. कोल्हापुरातील आनंद यात्री ग्रुपचे आप्पासाहेब इनामदार यांनीदेखील अक्षयदान भगवान महावीर अध्यासनास दिले. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

0 7 MAY 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रयतेच्या राजाला अभिवादन...

## विविध संस्था, संघटनांकडून राजर्षी शाहू महाराजांना पुण्यतिथीदिनी वंदन

प्रतिनिधी
कोल्हापूर

- शाहू समाधीस्थळासह दसरा चौकातील शाहूराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण
- पोलीस बॅण्डकडून मानवंदना

रयतेचा राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना त्यांच्या १०३ व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी शहरातील विविध संस्था, संघटनांकडून अभिवादन करण्यात आले. नर्सरी बागेतील राजर्षी शाहूंच्या समाधीबरोबरच दसरा चौकातील शाहू महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. राजर्षी शाहूंच्या कार्याचे स्मरण करत नवसंकल्प करण्यात आले. परिसरातील शाहूप्रेमींनीही स्वयंस्फुर्तीने शाहू समाधीस्थळावर जाऊन फुले, पुष्पहार अर्पण करुन कृतज्ञता व्यक्त केली. सोशल मिडीयावर राजर्षी शाहूंच्या प्रतिमांचे स्टेटस् ठेवत अभिवादन केले.

**राजर्षी शाहू छत्रपती मेमोरिअल ट्रस्ट**

दसरा चौकात राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याला राजर्षी शाहू छत्रपती मेमोरिअल ट्रस्टच्यावतीने अभिवादन करण्यात आले. ट्रस्टचे विश्वस्त, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते राजर्षी शाहूंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली, ट्रस्टच्या सचिव व जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांच्यासह पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या प्रतिनिधीकडूनही पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी पोलीस बॅण्डकडून राजर्षी शाहू महाराजांना मानवंदना देण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांनी २८ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक सामाजिक सुधारणा करुन जनतेला नवी दिशा दिली. जनतेनेही राजर्षी शाहूंच्या कार्याचा विसर पडू दिलेला नाही, यातून जनता राजर्षी शाहूंवर किती प्रेम करते, हे स्पष्ट होते अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, ट्रस्टचे प्रशासक राजदीप सुर्वे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, प्रभारी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, डॉ. अशोक चौसाळकर, दत्तात्रय नांगरे आदी उपस्थित होते.

**सामाजिक सलोखा मंच**

सामाजिक सलोखा मंचमधील तब्बल ६१ जाती, धर्मातील लोक नर्सरी बागेतील राजर्षी शाहू महाराजांच्या समाधीस्थळावर अभिवादन करण्यासाठी एकत्र आले. ज्येष्ठ मंडळींच्या हस्ते शाहूंच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सामाजिक सलोखा मंचचे निमंत्रक वसंतराव मुळीक, सहनिमंत्रक बबनराव रानगे, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले, दि माहोमेडन एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन गणी आजगेकर, डी. जी. भास्कर, बाळासाहेब भोसले, अशोक भंडारे, चंद्रकांत पाटील, कादर मलबारी, अशोक माळी, भाऊसो काळे, आनंद माळुंगकर, सुशील कोल्हटकर, चंद्रकांत कांडेकरी, दिलीप सावंत, दिलीप देसाई, गणपतराव बागडी सुंदरराव देसाई उमेश बुधले, रफिक शेख, किरण पडवळ, अवधूत पाटील, शैलजा भोसले, सुनीता पाटील, संयोगीता देसाई, संजीवनी चौगुले, सुधा सरनाईक, बबिता जाधव, आयेशा खान, वैजयंती साळोखे, मालती दुर्गुळे, गीता हसुरकर, स्वाती कोरगावकर आदी उपस्थित होत्या.



कोल्हापूर : राजर्षी शाहू छत्रपती मेमोरिअल ट्रस्टच्यावतीने राजर्षी शाहू महाराजांना पुण्यतिथीदिनी मंगळवारी दसरा चौकातील राजर्षी शाहूंच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. पी. एस. पाटील, मोहिनी चव्हाण, डॉ. अशोक चौसाळकर, प्रभारी पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे उपस्थित होते.

तरुण भारत

# नॅनोसायन्स, टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू

## शिवाजी विद्यापीठ प्रशासनाची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विभागात विद्यार्थ्यांना बी.एस्सी. नॅनो सायन्स व तंत्रज्ञान या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

ज्या विद्यार्थ्यांना आपल्या बुद्धीला चालना देऊन शास्त्र व तंत्रज्ञान (सायन्स अँड टेक्नॉलॉजी) यामध्ये आव्हानात्मक करिअर करायचे आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी 'नॅनो सायन्स व नॅनो टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. संशोधन, उद्योजकता आणि विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयय स्तरावरील कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळतात. बॅचलर ऑफ सायन्स (B.Sc.), मास्टर्स ऑफ सायन्स (M.Sc.), B.Sc. M.Sc. इंटिग्रेटेड, आणि बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी यासारखे अभ्यासक्रमला प्रवेश घेवू शकतात. या पुढील पीएच. डी. पर्यंतचे शिक्षण आणि पोस्टडॉक्टर फेलोशिप व संशोधनासाठी भारत व भारताबाहेर संधी उपलब्ध आहेत. संबंधित अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात उपलब्ध आहेत. स्कूल ऑफ नॅनोसायन्स व नॅनोटेक्नॉलॉजी या अधिविभागमध्ये बी.एस्सी. एम.एस्सी. नॅनोसायन्स व नॅनोटेक्नॉलॉजी (इंटिग्रेटेड) या प्रोग्रॅमसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण झालेल्या इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. त्याचप्रमाणे बी. एस्सी रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी एम–एस्सी नॅनोसायन्स व नॅनोटेक्नोलॉजीसाठी प्रवेश घेऊ शकतात.

आजपर्यंत या अधिविभागातून अनेक विद्यार्थ्यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून ते संशोधन, उद्योजकता तसेच शासकीय व खाजगी कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.